**प्रेसनोट** दिनांक २४/१२/२०२४

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांनी लाचेची मागणी प्रकरणी कारवाई केलेबाबत''**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| गुन्हा नोंद क्रमांक | मांडवी पोलीस ठाणे, मिरा–भाईदर, वसई–विरार पोलीस आयुक्तालय<br>गु.र.नं. ३२८/२०२४, भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा सन १९८८ (सुधारीत अधिनियम २०१८) चे कलम ७, १२ प्रमाणे दिनांक २४/१२/२०२४ रोजी. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री. संदिप तुकाराम चौरे, वय– ३८ वर्षे, पद – वनपरिक्षेत्र अधिकारी, मांडवी वन विभाग, ता. वसई, जि.पालघर<br>२) श्री. चंद्रकांत पाटील, खाजगी इसम, राहणार– रूम नंबर ए/१०२, राजहिल बिल्डींग, व्हिवा वेदांतजवळ, मनवेलपाडा रोड, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर.<br>३) अनोळखी खाजगी इसम |
| आरोपी अटक | नाही |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | २०,००,०००/– रू. लाचेची रक्कम मागणी करून त्यातील अर्धी रक्कम १०,००,०००/– रू. काम होण्यापूर्वी व उर्वरीत रक्कम १०,००,०००/– रू. काम झाल्यानंतर. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ––. |

**थोडक्यात हकीगत:–** यातील तक्रारदार यांचे मालकीचे वसई तालुक्यातील गाव ससुनवघर हद्दीत 'विस्तारीत ससुपाडा' गावठाण या ठिकाणी सर्वे नं. ३७१ (नविन सर्वे क्रमांक १४१) मधील ०७ गुंठे हि मिळकत वनविभाग क्षेत्रामध्ये येत असुन ती सन २००५ मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उदयान वनविभाग, बोरीवली पश्चिम मुंबई यांनी मिळकत ताब्यात घेवुन जागा सिल केली होती. तक्रारदार यांच्या जप्त मिळकतीच्या प्रकरणामध्ये लोकसेवक श्री. एस. टी. चौरे वनक्षेत्रपाल, मांडवी यांनी वरिष्ठ कार्यालयास सादर करावयाचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल सहायक वनसंरक्षक, घोलविरा, डहाणू यांच्याशी बोलुन तक्रारदार यांच्या बाजुने देण्याकरीता व तक्रारदार यांची जप्त मिळकतीवर ताबा मिळवुन देण्याकरीता कागदोपत्री मदत करण्याच्या मोबदल्यात दि. ०६/११/२०२४ रोजी रू. २०,००,०००/– रक्कमेची मागणी मागणी केली. तक्रारदार यांची लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक १८/११/२०२४ रोजी ला.प्र.वि. पालघर येथे तक्रार केली.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. १९/१२/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये आलोसे यांनी तक्रारदार यांच्या बाजुने अहवाल देण्याचे व जप्त मिळकतीवर पुन्हा ताब्यात मिळवुन देण्याकरीता आवश्यक कागदोपत्री मदत करण्याची तयारी दाखवुन ठरलेल्या लाचेची रक्कमेची मागणी करून हस्तकामार्फत स्विकारणार असल्याचे कबुल केल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

तसेच लोकसेवक श्री. एस. टी. चौरे यांनी दि. १३/१२/२०२४ रोजीच्या पडताळणी कारवाईमध्ये चंद्रकात पाटिल व एक अनोळखी इसम यांच्याशी बोलणी करण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे चंद्रकात पाटिल यांनी लोकसेवक चौरे यांच्यावतीने लाचेच्या एकुण २०,००,००/– रक्कमे पैकी रू. १०,००,०००/– लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शवली व ब्रॉड वे, राधाकृष्ण मंदिरासमोरील रोडवर, एव्हर शाईन सिटी, वसई पुर्व याठिकाणी लोकसेवक श्री. चौरे यांच्यावतीने लाचेची रक्कम स्विकारण्याकरीता प्रत्यक्ष एमएच–४८ सीके–३७४१ या वाहनासह हजर राहीले म्हणुन लोकसेवक श्री. एस. टी. चौरे, वनक्षेत्रपाल, मांडवी व श्री. चंद्रकांत पाटील (खाजगी इसम) आणि अनोळखी इसम यांचेविरूध्द मांडवी पोलीस ठाणे, मिरा–भाईदर, वसई–विरार पोलीस आयुक्तालय येथे गु.र.नं.३२८/२०२४, भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा सन १९८८ (सुधारीत अधिनियम २०१८) चे कलम ७, १२ प्रमाणे दिनांक २४/१२/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मार्गदर्शक अधिकारी – मा.श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री.गजानन राठोड, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री.संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र,**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

**संपर्क पत्ता :–** लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय कक्ष क्र. १०८,
प्रशासकीय इमारत–'ब', जिल्हा मुख्यालय,पालघर–बोईसर रोड, कोळगाव, ता.
जि. पालघर. पिनकोड – ४०१४०४.
संकेतस्थळ :– https://www.acbmaharashtra.gov.in/
ई–मेल :– dyspacbpalghar-mum@mahapolice.gov.in
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297

( हर्षल चव्हाण )
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर**